**रे.मु.क्र. ९७/२०२२**
**नि.क्र. १८/क लगत**

<u>**वादीतर्फे साक्षीदार क्र. १ मारूती एकनाथ डाकी यांचा सरतपास वादीचे वकिल श्री. धीरज डाकी यांच्यातर्फे शपथेवर सुरू**</u>

१. मी प्रकरणामध्ये मौजे विंधणे येथील भुमापन क्र. १५०/८ चा ७/१२ चा उतारा दाखल केला आहे. करीता सदर ७/१२ च्या उताऱ्यास **निशाणी क्र. १९** देण्यात येतो. तसेच मी प्रकरणामध्ये कुलमुखत्यारपत्र क्र.७०८०/२०१६ ची प्रमाणित प्रत दाखल केली आहे. सदर दस्तावर माझी सही आहे व मजकुर बरोबर आहे. सदर दस्त प्रमाणित प्रत असल्याने त्यास **निशाणी क्र. २०** देण्यात येतो. तसेच मी प्रकरणात खरेदीखत क्र. १८२५/२०१६ ची प्रमाणित प्रत दाखल केली असून मुळ खरेदीखत प्रतिवादीच्या ताब्यात आहे. सदर दस्त प्रमाणित प्रत असल्याने त्यास **निशाणी क्र. २१** देण्यात येतो.

**प्रतिवादी व त्यांचे वकिलांचा पुकारा केला असता गैरहजर करीता उलटतपास बंद करण्यास सबळ कारण असल्याने प्रतिवादीतर्फे उलटतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत

सही/-

उरण,
(एस.पी. वानखडे)

दिनांक – २३/०४/२०२६
दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, उरण